हिंगोली Live
शनिवार दि. १४ जानेवारी २०२३ https://www.deshonnati.com
हिंगोली, शनिवार, दि. १४ जानेवारी २०२३

शैक्षणिक वर्ष

2022-2023

सांस्कृतिक

# 'काव्य स्पंदन' भित्तिपत्रकाचे विमोचन

देशोन्नती वृत्तसंकलन...

**हिंगोली :** येथील आदर्श महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करिता मराठी भाषा व वाङ्‌मय मंडळाचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.विलास आघाव यांच्या अध्यक्षतेखाली व प्रो. डॉ. शत्रुघ्न जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी संपादित केलेल्या 'काव्य स्पंदन' या भित्तिपत्रकाचे विमोचन करण्यात आले. वाङ्‌मय मंडळाचे पदाधिकारी कु. अदिती जावळे, यश पेंढारकर, कु.दिपाली पोले, कु.दीक्षा हेंद्रे, नितीन दीप्रके, कु.पल्लवी परसवाळे, कु.अंकिता मईंग यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.सुरेश लेकुळे यांनी केले तर प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ.लक्ष्मण सोळंके, प्रा. आकाश बांगर, प्रा.दीपक खिल्लारे हे होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. महेश मंगनाळे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.मारोती कोल्हे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. (प्रतिनिधी)



(शैक्षणिक वर्ष- 2022-2023)

देशोन्नती
# हिंगोली Live
मंगळवार दि.३१ जानेवारी २०२३ https://www.deshonnati.com

देशोन्नती

## आदर्श महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्त कवी संमेलन आणि कथाकथन

देशोन्नती वृत्तसंकलन...

हिंगोली : महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार १४ ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा साजरा करण्यात येतो. त्यानिमित्त आदर्श महाविद्यालयात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. विलास आघाव यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्यांच्या काव्यवाचन आणि कथाकथन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे काव्यवाचन केले. या काव्यमय कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी मनमुराद दाद दिली. यावेळी यश पेंढारकर, शरयू खरात, छाया कऱ्हाळे, शितल मगर, रश्मी बल्लाळ, वैष्णवी गायकवाड, सरगम खिल्लारे, सेजल बिडवई, दिपाली पोले यांसह अनेक विद्यार्थ्यांनी आपापल्या काव्यरचना सादर करून कार्यक्रमास रंगत आणली.

तसेच या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी संपादित केलेल्या 'शब्द पालवी' या भित्तिपत्रकाचे विमोचन प्रभारी प्राचार्य डॉ.विलास आघाव, मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. शत्रुघ्न जाधव, प्रा.डॉ.सचिन हाटकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या



यशस्वीतेसाठी डॉ. लक्ष्मण सोळंके, डॉ. सुधाकर मालेराव, प्रा.टी.व्ही.आढे, प्रा.रामप्रसाद खडगीर यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुरेश लेकुळे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. महेश मंगनाळे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. (प्रतिनिधी)



मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त भित्तीपत्रकाचे विमोचन.



कार्यक्रम प्रसंगी उपस्थित विद्यार्थी.